**सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.0' राबविण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सिंधुर-२०२६/प्र.क्र.१८(ई-१६३६००१)/का.१४८१-अ**
**मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १८ मे, २०२६**

**प्रस्तावना**

महाराष्ट्र शासनाचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना मा. मुख्यमंत्री महोदय यांनी शुक्रवार, दि.०६ मार्च, २०२६ रोजी, केलेल्या भाषणात "सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या सर्वंकष विकासासाठी 'सिंधुरत्न समृध्द योजना' सन २०२४-२५ पर्यंत तीन वर्षासाठी राबविण्यात आली होती. पुढील तीन वर्षाकरिता 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' प्रस्तावित करण्यात येत आहे" अशी घोषणा केलेली आहे. त्या अनुषंगाने 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' राबविण्याचा मा.मंत्रिमंडळ मान्यतेने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय**

सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीचे परिणामकारक नियोजन करून या जिल्ह्यांचा सर्वंकष विकास करण्याच्या दृष्टीने या दोन जिल्ह्यांसाठी 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' ही योजना सन २०२६-२७ ते २०२८-२९ या ३ वर्षासाठी राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**२. 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.0' योजनेचे प्रमुख उद्दिष्ट**

सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यातील नैसर्गिक साधन संपत्ती आणि समुद्र किनारा याच्या दृष्टीकोनातून पर्यटनास आणि मत्स्यव्यवसायास चालना देऊन रोजगार निर्मिती आणि दरडोई उत्पन्नात वाढ होऊन लोकांचे जीवनमान उंचाविणे तसेच सदर जिल्ह्यांचा सर्वंकष शाश्वत विकास घडविणे.

**३. योजनेची व्याप्ती**

१) 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.0' योजना सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांकरिता असेल.

२) या योजनेतंर्गत पर्यटन आणि मत्स्यव्यवसायाशी निगडीत केंद्र, राज्य, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण / अनुसूचित जाती घटक कार्यक्रम / आदिवासी घटक कार्यक्रम) योजनांना पूरक असलेली तसेच विकसित महाराष्ट्र २०३० कृती आराखडा आणि जिल्हा विकास आराखड्यातील उद्दिष्टांशी सुसंगत कामे राबविता येऊ शकतील.

३) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांच्या आर्थिक विकासात बहुविध वृद्धी करण्याकरिता प्रामुख्याने मूलभूत सुविधांची कामे, 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-२ अंतर्गत घेणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील कामे तसेच / किंवा अशा स्वरूपाची अन्य कामे हाती घेता येतील.

क) बंदर धक्का (Wharfs) व पर्यटन नौका केंद्र (Marinas) या ठिकाणी मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाकरिता तसेच जलक्रीडा अनुभव यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे.

ख) जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी प्रसाधन गृहे, पिण्याचे पाणी, खाद्यकेंद्रे, प्राथमिक उपचार केंद्रे, पार्कींग, चार्जिंग पॉईटस्, पोहोच रस्ता इ. सुविधा निर्माण करणे.

ग) जिल्ह्यातील अविकसित बॅक वॉटर च्या परिसरात जलक्रीडाला प्रोत्साहन देण्यासाठी मूलभूत सोयी सुविधा पुरविणे

घ) कॅराव्हॅन पर्यटन विकासासाठी कॅराव्हॅन मार्गावर पार्कींग, प्रसाधन गृहे, चार्जिंग पॉईटस् सुविधा उपलब्ध करून देणे

च) कॅराव्हॅन कॅम्पिंग सुविधा निर्माण करणे

छ) बॅक वॉटर पर्यटन विकसित करणे

ज) मासळी उतरवण्याचे केंद्र

झ) मासळी बाजाराकरिता सुविधा निर्माण करणे

ट) मत्स्य बीज उत्पादन केंद्र

ठ) मत्स्य साठवणूक व विक्री केंद्र सुशोभिकरण करून पर्यटनदृष्ट्या विकसित करणे

ड) मत्स्यालय

ढ) आंबा, काजू तसेच तत्सम कोकणातील कृषी आणि फलोत्पादनाला प्रोत्साहन देणाऱ्या योजना

त) बचत गट सक्षमीकरण

**४. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे दोन भागात करण्यात यावी.**

**४.१) भाग-१ 'सिंधुरत्न समृद्ध' योजनेतील प्रलंबित कामे दि.३१ मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण करणे**

'सिंधुरत्न समृध्द' योजनेच्या सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या तीन वर्षांच्या कालावधीत प्रशासकीय मान्यता आणि कार्यादेश देऊन सुरु झालेली परंतु अपूर्ण राहिलेली कामे दि.३१ मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याकरिता 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-१ अंतर्गत कामांच्या प्रगतीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४.२) भाग-२ 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' अंतर्गत नवीन कामांची अंमलबजावणी सन २०२६-२७ ते २०२८-२९ या कालावधीत करणे**

(१) 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-२ अंतर्गत सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांनी प्रत्येकी रु.२०० कोटीचा आराखडा तयार करावा. सदर आराखडयातील सर्व कामे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता देऊन सुरु करण्यात यावीत. सदरहू कामे गुणवत्ता पूर्वक सन २०२६-२७ ते सन २०२८-२९ या कालावधीतच पूर्ण करण्यात यावीत.

(२) 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेचा कालावधी सन २०२६-२७ ते सन २०२८-२९ असा तीन वर्षाचा राहील. योजनेकरिता प्रति जिल्हा रु.२०० कोटी याप्रमाणे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्याकरिता तीन वर्षात एकूण रु.४०० कोटी निधीची तरतूद करण्यात येईल.

(३) 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांना, सदरहू कामांच्या प्रगतीनुसार निधी वितरण करण्यात येईल.

**५. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' करिता सिंधुरत्न कार्यकारी समितीची संरचना**

सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्याकरिता 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-२ अंतर्गत स्वतंत्र आराखडा तयार करणे व त्याची कालबध्द अंमलबजावणी करण्याकरिता दोन स्वतंत्र "सिंधुरत्न कार्यकारी समिती" गठित करण्यात येत आहेत. या समितीची संरचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | समितीचे अध्यक्ष/सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग / रत्नागिरी | अध्यक्ष |
| २ | मा.मुख्यमंत्री महोदय यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती | उपाध्यक्ष |
| ३ | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग / रत्नागिरी | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग / रत्नागिरी | सदस्य |
| ५ | सिंधुदुर्ग / रत्नागिरी जिल्हास्तरावरील कार्यान्वयन यंत्रणांचे प्रमुख अधिकारी | सदस्य |
| ६ | जिल्हा नियोजन अधिकारी, सिंधुदुर्ग / रत्नागिरी | सदस्य सचिव |

**५.१** वरील सदस्यांव्यतिरिक्त 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेच्या संबंधित विकास क्षेत्रातील कोकण विभागातील विविध प्रशासकीय विभागांचे विशेष अनुभव असलेले विभागीय स्तरावरील अधिकारी, नामवंत अशासकीय संस्था व खाजगी क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांच्याशी विचारविनिमय करण्याकरिता त्यांना कार्यकारी समिती बैठकीत अध्यक्ष यांच्या निर्देशानुसार 'निमंत्रित सदस्य' म्हणून बोलविता येईल.

**५.२** सिंधुरत्न कार्यकारी समितीची बैठक किमान तीन महिन्यातून एकदा घेण्यात येईल.

**६. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेच्या 'सिंधुरत्न कार्यकारी समिती' ची कार्यकक्षा**

(१) 'सिंधुरत्न समृद्ध योजना २. 0' च्या भाग १ मधील 'सिंधुरत्न समृद्ध' या योजनेतील प्रलंबित कामे गुणवत्तापूर्वक दि.३१ मार्च, २०२७ पर्यंत पुर्ण करण्याच्या दृष्टीने आढावा घेणे.

(२) 'सिंधुरत्न समृद्ध योजना २. 0' च्या भाग-२ करिता जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व रत्नागिरी यांनी कार्यान्वयीन यंत्रणांच्या अधिकाऱ्यांच्या सहाय्याने तीन वर्षांकरिताच्या आर्थिक भारासहित सादर केलेल्या प्रारुप आराखड्यास मान्यता देणे.

(३) 'सिंधुरत्न समृद्ध योजना २. 0' या योजनेअंतर्गत भाग-२ मधील कामे गुणवत्तापूर्वक कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्याकरिता कामाचा आढावा घेणे व मार्गदर्शन करणे.

**७. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेकरिता 'प्रकल्प व्यवस्थापन कक्ष'**

'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेच्या कालबध्द अंमलबजावणीकरिता सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली 'प्रकल्प व्यवस्थापन कक्ष' स्थापन करण्यात यावा. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यांच्या 'प्रकल्प व्यवस्थापन कक्ष' करिता ०१ प्रकल्प व्यवस्थापक, ०१ सहायक प्रकल्प व्यवस्थापक, ०१ प्रकल्प सहायक व ०२ डाटा एन्ट्री ऑपरेटर या ०५ पदांचा अंतर्भाव असेल. सदर पाचही पदे 'बाह्य स्त्रोताद्वारे (Out Sourcing)' विहित कार्यपध्दतीने भरण्यात यावीत. सदर पदांसाठी शैक्षणिक अर्हता, मानधन इ. खालीलप्रमाणे राहिल.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा ठोक मानधन (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापक | MBA / MSW किंवा अर्थशास्त्र या विषयावरील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण व किमान ३ वर्षाचा व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभव | **रु.८६,०००/-** |
| २ | सहायक प्रकल्प व्यवस्थापक | कोणत्याही विषयातील पदवी व व्यवस्थापन क्षेत्रातील पदविका उत्तीर्ण आणि किमान २ वर्षाचा व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभव | **रु.६४,०००/-** |
| ३ | प्रकल्प सहायक | कोणत्याही विषयातील पदवी उत्तीर्ण आणि माहिती संकलित करण्याचा किमान २ वर्षाचा अनुभव | **रु.४५,०००/-** |
| ४ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | किमान १२ वी उत्तीर्ण व MS-CIT प्रमाणपत्र धारक | **रु.१७,०००/-** |

'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' या योजनेकरिता 'बाह्य स्त्रोताद्वारे (Out Sourcing)' विहित कार्यपध्दतीद्वारे भरण्यात येणारे प्रकल्प व्यवस्थापक, सहायक प्रकल्प व्यवस्थापक व प्रकल्प सहायक यांना प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रवास करावयाचा झाल्यास त्या पदाच्या अनुरुप प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय

करता येईल. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व रत्नागिरी यांना आवश्यकतेनुसार महास्ट्राईड अंतर्गत त्या जिल्ह्यांना उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा वापरही करता येईल.

**८.** जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व रत्नागिरी यांनी 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' ची अंमलबजावणी करताना 'सिंधुरत्न समृध्द' या योजनेच्या फलनिष्पत्तीबाबत अध्ययन व मुल्यमापन तसेच प्रभाव मुल्यांकन (Impact Assessment) याबाबत यशदा, पुणे या संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालातील शिफारशींचा विचार करावा.

**९.** सिंधुरत्न कार्यकारी समितीने 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' भाग-२ अंतर्गत मान्यता दिलेल्या कामांना विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी यांना असतील. तसेच कामांना तांत्रिक मान्यता देण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. कामाशी संबंधित असणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत कामांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**१०. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' करिता आस्थापना निधी**

'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' साठी अर्थसंकल्पित करण्यात येणाऱ्या निधीच्या २ टक्के निधी आस्थापना विषयक बाबी हाताळण्यासाठी अनुज्ञेय राहील. सदर निधीचा विनियोग खालील प्रयोजनासाठी करणे अनुज्ञेय राहील.

अ) १ टक्के निधी 'प्रकल्प व्यवस्थापन कक्ष' करिता आवश्यक मनुष्यबळाचे ठोक मानधन आणि या योजनेतंर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या निरिक्षणांकरिता करावयाच्या प्रवास खर्चावर करता येईल.

आ) उर्वरित १ टक्के निधी कार्यकारी समितीच्या बैठकांचे आयोजन करणे, 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' या योजनेच्या अनुषंगाने आयोजित करावयाच्या कार्यशाळा व प्रशिक्षण, प्रसिद्धी साहित्य व प्रसिद्धी, वार्षिक अहवाल प्रसिद्ध करणे तसेच 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' या योजनेच्या सन २०२८-२९ या अंतिम वर्षात योजनेचे अध्ययन, मूल्यमापन व प्रभाव मुल्यांकन (Impact Assessment) करण्याकरिता वापरता येईल. याकरिता यशदा, पुणे/ अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय अथवा नामवंत बाह्य संस्थांना करारबद्ध करता येईल.

**११. 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' योजनेचे लेखाशिर्ष**

'सिंधुरत्न समृध्द' योजनेकरिता नियोजन विभागाच्या मागणी क्र.ओ-७ व ओ-१० अंतर्गत महसूली व भांडवली लेखाशीर्ष अनुक्रमे '३४५१- सचिवालय आर्थिक सेवा' आणि '४५१५- इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च' याप्रमाणे उघडण्यात आलेल्या लेखाशिर्षाअंतर्गत 'सिंधुरत्न समृध्द योजना २.0' करिता अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात यावी.

**१२.** सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**१३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५१८१४५६०७५८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

NITIN BHANUDAS KHEDKAR

Digitally signed by NITIN BHANUDAS KHEDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=99977b58556463dbb2db463cec9482d13f7661ed3b2a95e83e386485fff4c21e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CFCA827F49093860DB8AA4627DA10E31F82BD40A9631D2E01EC212A473A6BCA2, cn=NITIN BHANUDAS KHEDKAR
Date: 2026.05.18 14:56:55 +05'30'

**( नितिन खेडकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.अध्यक्ष, सिंधुरत्न कार्यकारी समिती.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
९. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
१०. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व रत्नागिरी.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग व रत्नागिरी.
१२. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण विभाग, कोकण.
१३. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग व रत्नागिरी.
१४. नियोजन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव.
१५. निवड नस्ती, का-१४८१-अ, नियोजन विभाग.